Guidance under *Lekhak Aaplaya Bhetila* Initiative.

# नूतन मराठा महाविद्यालयात 'लेखक आपल्या भेटीला' उपक्रमात मार्गदर्शन

**प्रतिनिधी** | जळगाव

नूतन मराठा महाविद्यालय आणि मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख व उपप्राचार्य डॉ. के. बी. पाटील यांच्या संकल्पनेतून 'लेखक आपल्या भेटीला' हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीताने झाली. एफवायबीएच्या अभ्यासक्रमात 'दप्तर' या कथेचे लेखक प्रा. राहूल निकम यांनी मराठी भाषेची वाटचाल स्पष्ट करुन मराठी भाषेचे महत्त्व आणि तीचे जतन-संवर्धन करण्यासाठी वाचन संस्कृती रुजवणे अत्यंत आवश्यक आहे असे सांगितले. जिथं पिकतं तिथं विकत नाही आणि अमृताशी पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेकडे मराठी माणूस वळत नाही अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. डॉ. के. बी. पाटील यांनी लेखक होण्यासाठी खूप मोठी साधना आणि प्रतिभा असावी लागते. या लेखनाच्या आणि जनसंवादाच्या माध्यमातूनच कवयित्री बहिणाबाई चौधरी आणि संत गाडगेबाबा यांचे नाव विद्यापीठाला देण्यात आली. मराठी विभाग प्रमुख प्रा. ललिता हिंगोणेकर, प्रा. अर्जून पाटील, प्रा. रत्नाकर कोळी यांनी देखील माहिती दिली. या वेळी प्राध्यापक उपस्थित होते.



मार्गदर्शन करताना प्रा. राहुल निकम.